॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572

Phone: (02462) 215325

**Public Relations Office (PRO)**

जनसंपर्क कार्यालय

website: srtmun.ac.in

E-mail: pro@srtmun.ac.in

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/९४ दि.१९/०८/२०२४

## विद्यार्थी आणि ग्रंथालयाचे अतूट नाते -कुलगुरू डॉ. मनोहर चासकर



विद्यार्थी जास्तीत जास्त वेळ ग्रंथालयाच्या सहवासात असतात. त्यामुळे विद्यार्थी व ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांमध्ये जिव्हाळ्याचे नाते निर्माण होते. अभ्यासासाठी, स्वतःच्या प्रगतीसाठी विद्यार्थी ग्रंथपाल, ग्रंथालयाशी आपुलकीचे, स्नेहाचे नाते जोडतात. ग्रंथपाल व ग्रंथालयीन कर्मच्चारीही विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण प्रगतीत मदत करतात. विद्यार्थी व कर्मचारी यांच्यात सतत संवाद असतो. त्यातून विद्यार्थी आणि ग्रंथालयाचे अतूट नाते निर्माण होते असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांची जयंती व ग्रंथपाल दिनानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ज्ञान स्रोत केंद्रामध्ये आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, वित्त व लेखाधिकारी मोहम्मद शकील, भूशास्त्र संकुलाचे संचालक तथा ज्ञान स्रोत समितीचे सदस्य डॉ. अविनाश कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी कुलगुरू व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प.पू. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे चंदनहार तर डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या कार्याचा परिचय करून देत कार्यक्रम आयोजनाची भूमिका विशद केली.

ज्ञान स्रोत केंद्रातील कर्मचारी कु. पूजा भुसारे या सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचा कुलगुरू व मान्यवरांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ग्रंथपाल दिनाच्या निमित्ताने ज्ञानस्रोत केंद्रातील सर्व कर्मचाऱ्यांना गुलाबपुष्प देऊन कुलगुरू महोदयांनी शुभेच्छा दिल्या.